आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० मार्च २०२४ -शनिवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ४ मान्यवरांना भारतरत्न प्रदान

- उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर राज्यात पहिल्या टप्प्यातल्या ५ लोकसभा मतदारसंघांत ९७ उमेदवार रिंगणात

- शरद पवारांकडून लोकसभेसाठी ५ उमेदवारांची घोषणा, सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, निलेश लंके यांना उमेदवारी

- लग्नसराईमुळे आठवडाभरात सोने तोळ्यामागे अडीच हजारांनी महाग

**आणि**

- राज्याच्या अनेक भागात रंगपंचमीचा उत्साह

<><><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान केले.  माजी प्रधानमंत्री पी व्ही नरसिंह राव यांच्या वतीने त्यांचे चिरंजीव पीव्ही प्रभाकर राव, चौधरी चरण सिंह यांच्या वतीने यांचे नातू जयंत सिंग, बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांच्या वतीनं त्यांचे चिरंजीव रामनाथ ठाकूर यांनी पुरस्कार स्वीकारला. कृषी शास्त्रज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांच्या वतीने त्यांच्या कन्या  नित्या राव यांनी भारतरत्न सन्मान स्वीकारला. माजी उपप्रधानमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना राष्ट्रपती, उद्या पुरस्कार प्रदान करतील. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे,

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि इतर मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

**<><><><><><>**

उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर राज्यात पहिल्या टप्प्यातल्या ५ लोकसभा मतदारसंघांत १३ जणांनी माघार घेतल्यानं ९७ उमेदवार रिंगणात आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली. रामटेकमध्ये २८, नागपूरमध्ये २६, भंडारा-गोंदियात २२, गडचिरोली-चिमूरमध्ये १२ आणि चंद्रपुरात १३ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. या तिन्ही मतदारसंघात राष्ट्रीय पातळीवर नोंदणीकृत असलेल्या पक्षांचे ३-३ उमेदवार आहे. काँग्रेस, भाजपा, शिवसेना आणि बहुजन समाज पक्षानं हे उमेदवार दिले आहेत.

राज्यातल्या मतदारांच्या संख्येत वाढ झाल्यानं मतदान केंद्रांची संख्या ४७४ ने वाढवून ९८ हजार ११४ मतदान झाली आहे. यातल्या १० हजार ६५२ मतदान केंद्रांवर पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. या ठिकाणच्या २३ हजार ३५६ मतदारांनी घरुन मतदान करण्याचा पर्याय निवडला आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. टपालाद्वारे ९ हजार ४१६ जण मतदान करणार आहेत. अंध मतदारांसाठी निवडणूक आयोगानं ब्रेलमध्ये मतदानाची माहिती देण्याची सोय उपलब्ध केली आहे. राज्यात सध्या १ लाख १६ हजार ५१८ अंध मतदार आहेत.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यातल्या २६ हजार ६८५ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई गुरुवारपर्यंत झाली आहे. २७ हजारांहून अधिक शस्त्र जमा झाली असून १९० शस्त्र जप्त केली आहेत. परवाना नसलेली ५५७ शस्त्रही जमा केलेली आहे.

आतापर्यंत ३३ कोटी १२ लाख रुपयांची रोख रक्कम राज्यात जमा झाली असून

१९ कोटी ३४ लाख रुपयांचं मद्य निवडणूक यंत्रणांनी जप्त केलं आहे. याशिवाय १८६ कोटींचे अमलीपदार्थ, ४० कोटी २३ लाख रुपयांचे मौल्यवान धातू आणि ६३ कोटी १७ लाख रुपयांच्या इतर वस्तू आयोगानं जप्त केल्या आहेत. यासाठी पावणे ४ हजार पथकं राज्यभरात कार्यरत आहेत.

**<><><><><><>**

नांदेड लोकसभा मतदारसंघामध्ये आज आणखी २ उमेदवारी अर्ज दाखल झाले. त्यामुळं गेल्या गुरुवारी दाखल झालेल्या एका अर्जासह एकूण अर्जांची संख्या आता ३ वर पोचली आहे.

हिंगोली लोकसभा मतदार संघातल्या निवडणुकीसाठी आज शिवसेनेचे उमेदवार हेमंत श्रीराम पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. हा अर्ज या मतदार संघातला पहिलाच अर्ज आहे.

परभणी लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी आज 2 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**<><><><><><>**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट निवडणूक आयोगानं ठेवलं आहे. त्यासाठी थेट मतदान केंद्रांच्या पातळीवर जाऊन आढावा घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी आकाशवाणीला दिली आहे.

श्रोते हो, ही संपूर्ण मुलाखत आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर दोन भागात, आज आणि उद्या संध्याकाळी सव्वा सात वाजता वृत्तविशेष या कार्यक्रमात आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणीच्या समाज माध्यम खात्यांवर, Mumbai

AIR News युट्युब चॅनेलवर आणि आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्टवर देखील  हा कार्यक्रम उपलब्ध आहे.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं लोकसभा निवडणुकांसाठी पाच उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. बारामती मतदारसंघातून सुप्रिया सुळे, शिरूर लोकसभा मतदारसंघातून अमोल कोल्हे यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. याशिवाय, अहमदनगरमधुन निलेश लंके, वर्धा इथून अमर काळे आणि दिंडोरी मतदारसंघातून भास्कर भगरे यांना उमेदवारी देण्यात आल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज मुंबईत  एका पत्रकार परिषदेत केली. गेल्यावेळी नगरमधून संग्राम जगताप, दिंडोरीतून धनराज महाले आणि वर्ध्यातून काँग्रेसच्या चारुलता टोकस यांनी निवडणूक लढवली होती.

महाविकास आघाडीत जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात असून उर्वरित उमेदवारांची घोषणा करण्यात येणार असल्याचंही जयंत पाटील यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर परभणीतून महायुतीचे उमेदवार असतील. सोमवारी ते परभणीतून अर्ज भरणार असून यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित असतील, असा दावा त्यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केला.

महाविकास आघाडीतल्या शरद पवार वगळता इतर पक्षांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळं महायुतीमध्ये असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

दिल्लीत झालेल्या महायुतीच्या बैठकीत आपल्या उमेदवारी बाबत चर्चा करण्यात आली असून तसं आपल्याला कळवण्यात आलं आहे. मात्र जागा

वाटपाचा निर्णय झाला नसल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी दिली आहे.

दरम्यान, काल छगन भुजबळ यांचे विरोधात नाशिक शहरात मराठा आरक्षण विरोधी असल्याचे फलक लावण्यात आले होते. त्याविषयी त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**<><><><><>**

बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार नसल्याचं शिवसेना नेते विजय शिवतारे यांनी आज स्पष्ट केलं. एकनाथ शिंदे यांची वरिष्ठ नेत्यांसमोर नामुष्की होऊ नये म्हणून ही माघार घेतली. दोन दिवसांपूर्वी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची भेट घेतली होती. या भेटीत मतदारसंघातल्या समस्या सोडवण्याचे आश्वासन मिळाल्यानं निवडणूक लढवणार नसल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार देणार नसल्याच मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आज आंतरवाली सराटी इथं जाहीर केलं. आपण स्वतः निवडणुकीपासून दूर राहणार असून निवडणुकीबाबतचा निर्णय समाजानं घ्यावा, असं जरांगे पाटील आजच्या  समाजबांधवांच्या बैठकीत म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील यांच्या स्नुषा डॉ अर्चना पाटील चाकूरकर यांनी आज भाजपात प्रवेश केला.मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाकूरकर यांचं पक्षात स्वागत केलं.

**<><><><><>**

जळगावमध्ये सोन्याचा बाजारभाव आज तोळ्यामागे ६८ हजार ३० रुपयांपर्यंत तर चांदीचा बाजारभाव ७५ हजार १३० रुपये किलोपर्यंत पोचला. लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर मागणी वाढल्यानं जळगावमधल्या सोन्या-चांदीच्या बाजारभावांनी गेल्या तीन आठवड्यात चांगलीच उसळी घेतली आहे. मार्च महिन्याच्या सुरूवातीला ६५ हजारापर्यंत पोचलेला सोन्याचा बाजारभाव ७ मार्चपर्यंत ६५ हजार ८०० रुपयांवर पोचला होता. गेल्या आठवडाभरात सोन्याच्या बाजारभावात अडीच हजारांहून अधिक वाढ झाली आहे.

**<><><><><><>**

राज्याच्या अनेक भागात आज रंगपंचमीचा सण उत्साहात साजरा झाला. लातूर शहरात असलेल्या पाणी टंचाईमुळं नागरिकांनी कोरडे रंग खेळणंच पसंत केलं. वृद्धाश्रमातल्या ज्येष्ठ नागरिकांबरोबर रंगपंचमी साजरी झाली. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी सोलापूर शहरातही युवक काँग्रेसनं कोरडी रंगपंचमी साजरी केली.

**नाशिकमध्ये** पेशवेकालीन रहाडी अर्थात जमिनीतल्या हौदाचं मानकऱ्यांच्या हस्ते पूजन करून रंग खेळला गेला.

**अहमदनगरमध्ये** भाविकांनी रंगपंचमीच्या निमित्तानं मोठ्या संख्येनं कानिफनाथांच्या संजीवन समाधीचं दर्शन घेतलं.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंट संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. लखनौच्या अटलबिहारी वाजपेयी मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता पंजाब किंग्ज् विरोधातला हा सामना सुरू होईल.

**<><><><><><>**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये आज तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. संपूर्ण विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागात उद्याही पावसाची शक्यता आहे.

-<><><><><><>

श्रातेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ आकाशवाणी आपल्यासाठी घेऊन येत आहे सोमवार १ एप्रिलपासून. संध्याकाळी सव्वा सात  ते साडे सात  वाजेदरम्यान आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

//<><><><><><>//